2019-20

# विद्यावार्ता®

MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

SPECIAL ISSUE-2020 01

Peer Reviewed International Refereed Research Journal

  

**शंकरराव पाटील महाविद्यालय, भूम व**

**डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**

यांच्या संयुक्त विद्यमाने

## "राजर्षी शाहू, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान " या विषयावर

## एक दिवसीय राष्ट्रीय आंतरविद्याशाखीय परिषद

प्राचार्य
डॉ.श्रीकृष्ण चंदनशिव



12) अस्पृश्योद्धारक राजर्षी शाहू महाराज
प्रा.डॉ. रामचंद्र पांडूरंग पवार, बीड ||50

13) शाहू महाराजांचे कृषी विषयक कार्याचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास
प्रा.डॉ. काकासाहेब पोकळे, बीड ||53

14) महात्मा फुले यांचे साहित्यातील योगदान
डॉ. एम. के. शिंदे, औरंगाबाद ||55

15) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महारांच्या सैन्य भरतीसाठी केलेले कार्य
प्रा.डॉ. नारायण दत्तात्रय बनसोडे, सोलापूर ||59

16) महात्मा फूले : आधुनिक सामाजिक विचारांचे अग्रणी
प्रा.डॉ. विनायक उध्दवराव पाटील, उस्मानाबाद ||64

17) राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार
प्रा.डॉ. फुलचंद सुर्यभान दुधभाते, उस्मानाबाद ||67

18) सावित्रीबाई फुले यांचे आधुनिक कवितेतील योगदान
कु. गायत्री आनंदराव भरनाळे, औरंगाबाद ||69

19) फुले, शाहू, आंबेडकर यांचे स्त्री-विषयक विचार
सौ. अर्चना वैजनाथ घोडके (शिंदे), औरंगाबाद ||72

20) स्त्रियांच्या शिक्षणासाठी राजर्षी शाहू महाराजांचे योगदान
अशोक गिताराम काळे, औरंगाबाद ||76

21) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक योगदान
प्रा. खजूरकर डी. टी., उस्मानाबाद ||78

22) महात्मा फुले यांचे शेतकरी जीवनविषयक विचार
डॉ. मुक्ता निवृत्ती बिरादार, नांदेड ||80

23) छत्रपती शाहु महाराजांचा सार्वत्रिक सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा - २९ सप्टेंबर १९१७
डॉ.सौ. देशमुख एस. डी., उस्मानाबाद ||82

24) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार व कार्य
डॉ. जनार्धन दामू परकाळे, सोलापूर ||87

www.vidyawarta.com/03 http://www.printingarea.blogspot.com

12

# अस्पृश्योद्धारक राजर्षी शाहू महाराज

प्रा.डॉ. रामचंद्र पांडूरंग पवार
इतिहास विभाग,
कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता.जि. बीड.

***********

**प्रस्तावना (Introduction) :-**

छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रतिकुल परिस्थितीत कुशाग्रबुद्धीमत्ता व अथक परिश्रमाद्वारे हिंदवी स्वराज्याची स्थापना केली. परंतु हिंदवी स्वराज्याचे अठराव्या शतकाच्या प्रारंभी वारसा हक्काच्या प्रश्नावरुन विभाजन झाले. सातारा व कोल्हापूर अशी स्वराज्याची दोन सत्ताकेंद्र निर्माण झाली. औरंगजेबाच्या २० फेब्रुवारी १७०७ मध्ये झालेल्या मृत्युनंतर त्यांचा धाकटा पुत्र अझमशहा याने मराठ्याच्या राज्यात दुही निर्माण व्हावी या उद्देशाने मोगलाच्या कैदेतील छत्रपती संभाजी पुत्र शाहूची सुटका केली. शाहू महाराजांच्या सुटकेमुळे मराठा सरदारात आणि मुत्सद्यामध्ये यादवी निर्माण झाली. या यादवीत काही मराठा सरदाराने शाहू हाच स्वराज्याचा वारसा आहे म्हणून शाहूचा पक्ष उचलून धरला. १२ जानेवारी १७०८ रोजी शाहूने आपणच खरे मराठा राज्याचे छत्रपती आहोत अशी घोषणा केली. सातारा हे राजधानीचे शहर निवडले परंतु यास विरोध करुन राजारामाच्या पत्नी ताराबाई यांनी मोठ्या हिंमतीने औरंगजेबाच्या आक्रमणापासून स्वराज्याचे रक्षण केले होते. ताराबाईच्या मते शाहू हा एक तोतया लुडबुड्या व मोगलांचा मांडलिक होता. त्यामुळे ताराबाईने पन्हाळ्याचा आश्रय घेऊन १७१० मध्ये आपल्या अज्ञान पुत्रास छत्रपती म्हणून घोषित केले आणि कोल्हापूर शहराची राजधानी म्हणून निवड केली. ताराबाई पुत्र पहिला शिवाजी हाच कोल्हापूरचा राजा होय. याच वंशपरंपरेतील चौथा शिवाजी दि. २५ डिसेंबर १८८३ मध्ये निपुत्रीक मरण पावला. त्यांच्या पत्नी महाराणी आनंदीबाईने कोल्हापूरच्या गादीला वारस म्हणून घाटगे कुटुंबातील यशवंत नावाच्या मुलास दत्तक घेतले. दत्तकपुत्र यशवंत हाच पुढे राजर्षी शाहू महाराज म्हणून नावरुपास आले.

**उद्दिष्टे**

१. राजर्षी शाहू महाराजांचे अस्पृश्योद्धारक म्हणून कार्य अभ्यासणे.
२. अस्पृश्य समाजाच्या वेदनेचा व शोषित जीवनाचा मागोवा घेणे.
३. अस्पृश्यांना शिक्षण प्रवाहात आणण्याकरिता वसतिगृह विषयी माहिती घेणे.
४. अस्पृश्यांच्या वतनदारी पद्धतीतील बदल अभ्यासणे.
५. संस्थानातील जातीभेद नष्ट करण्याकरिता केलेले प्रयत्न तपासणे.
६. कोल्हापूर संस्थानातील ५० टक्के आरक्षणाचा शोध घेणे.

**संशोधन पद्धती (Research Methodology)**

प्रस्तुत लघुशोधनिबंधात "अस्पृश्योद्धारक राजर्षी शाहू महाराज" या विषयावर आहे. या लघुशोधनिबंधासाठी इतिहास संशोधन पद्धतीतील चिकित्सक व वर्णनात्मक पद्धतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. या विषयाशी निगडीत संशोधन कार्याकरिता ऐतिहासिक साधन सामुग्रीचा उपयोग केला आहे. राजर्षी शाहू महाराजांचे कार्य खूपच व्यापक स्वरुपाचे असून बहुमूल्य आहे. येथे फक्त त्यांच्या अस्पृश्योद्धारक या विचारांपुरतेच मर्यादित आहे.

**अभिप्राय**

डॉ. य.दी. फडके यांच्या मते, "गेल्या शतकात महात्मा फुले यांनी स्वाभिमानाचे व समतेचे बी पेरुन जे झाड लावले त्याला खतपाणी घालून काळजीपूर्वक वाढविले ते राजर्षी शाहू छत्रपतींनी."

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजर्षी शाहू बद्दल असे मत व्यक्त केले की, "राजर्षी शाहू हे सामाजिक लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत."

गणेश आकाजी गवई (पत्रकार, बहिष्कृत भारताचे संपादक) यांनी बहिष्कृत भारतामध्ये "आमचा अब्राहम लिंकन" या शब्दात उल्लेख केला होता.

**अल्पपरिचय (Brief History)**

राजर्षी शाहूचे मूळ नाव यशवंत आबासाहेब घाटगे असे होते. त्यांचा जन्म २६ जुन १८७४ मध्ये घाटगे कुटुंबात कागल जहागिरीत झाला. कोल्हापूर संस्थानाचे चौथे शिवाजी मृत्यु पावल्यानंतर महाराणी आनंदीबाईंने १८८४ मध्ये यशवंत (शाहू) यांना दत्तक घेतले. राजकोट व धारवाड येथे त्यांचे शिक्षण झाले. बडोद्याचे गुणाजीराव खानविलकर यांची मुलगी लक्ष्मीबाई यांच्यासोबत विवाह दि. ०२ एप्रिल १८९४ मध्ये तर राज्याभिषेक विधी दि. ०६ मे १९२२ मध्ये झाला.

२० व्या शतकातील भारतातल्या मोठ्या नेत्यांच्या मालिकेत व आधुनिक महाराष्ट्राच्या शिल्पकारामध्ये राजर्षी शाहू महाराजांची गणना केली जाते. अवघ्या २८ वर्षाच्या कारकिर्दीत शाहू महाराजांनी कोल्हापूर शहराला 'कलापूर' बनविले. १९२२ च्या दरम्यान मोठ्या गणलया गेलेल्या ४२ संस्थानात कोल्हापूरचा समावेश होतो. या संस्थानाचे क्षेत्रफळ ३ हजार चौरस मैल व लोकसंख्या ८.३ लक्ष होती. तत्कालीन संस्थानाचा आकार, लोकसंख्या व उत्पन्नाच्या दृष्टीने

कोल्हापूर संस्थानाचा १३ वा क्रमांक होता,असा उल्लेख इंपिरियल गॅझेट मध्ये आहे.

छत्रपती शाहू महाराजांनी राजकीय, आर्थिक, सामाजिक व धार्मिक क्षेत्रात क्रांतीकारी कार्य केले. कोल्हापूर संस्थानाचा परराष्ट्रीय कारभार ब्रिटिश सरकारने पहावा आणि अंतर्गत कारभार राज्यातील सरकारने पहावा अशी व्यवस्था होती. अंतर्गत कारभाराचा जास्तीत जास्त कसा उपयोग करुन घेता येईल हे शाहू महाराजांनी ठरविले. या करीता खाजगी खर्चाला काट देऊन पैसा उभा केला. या पैशातून लोककल्याणकारी कार्यक्रम राबविला. शाहू महाराजांच्या आर्थिक धोरणाचे सूत्र "समताधिष्ठीत सामाजिक न्याय व समतोल आर्थिक विकास" हे होते.

**अस्पृश्य उद्धाराचे कार्य**

प्राचीन काळापासून भारतात जातीव्यवस्था व वर्णव्यवस्था अस्तित्वात असल्याचे दिसून येते. भारतीय समाज ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र अशा चार वर्णात विभागला आहे. पूर्वीपासूनच शूद्राची स्थिती अतिशय दयनीय होती. त्यांना सर्वच अधिकारापासून वंचित ठेवले होते. उच्च जातीचे लोक त्यांना अस्पृश्य समजून त्यांच्या सावलीपासून दूर राहत. अस्पृश्याच्या उद्धारासाठी राजर्षी शाहू महाराजांच्या पूर्वी गौतम बुद्ध व वर्धमान महावीरांनी प्रयत्न केले. मध्ययुगात भक्ति आंदोलने झाली. तसेच संत कबीर, गुरुनानक, संत तुकाराम यांनी अस्पृश्यता निवारण्याचे कार्य केले. आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात महात्मा फुले यांनी १८५१ मध्ये पुणे शहरात नानापेठेत अस्पृश्यांसाठी पहिली शाळा काढली. अशा रितीने हजारो वर्षे अज्ञानाच्या अंधारात कुजत व सडत पडलेल्या अस्पृश्यांना ज्ञानाची द्वारे खुली करुन त्यांच्यात परिवर्तन घडवून आणले. अस्पृश्यांच्या उद्धाराचे महात्मा फुलेंनी जे कार्य केले त्यांचीच प्रेरणा घेऊन राजर्षी शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात अस्पृश्य उद्धाराकरीता अविरत प्रयत्न केले.

**राजर्षी शाहूंचा आरक्षणविषयक दृष्टिकोन**

अज्ञानाने काळवंडून गेलेले आणि दारिद्र्याने गंजून गेलेल्या सर्वसामान्य लोकांचे जीवन ज्ञानाने उजळून निघावे, समृद्धीने बहरुन निघावे, अस्पृश्यांना योग्य न्याय मिळावा या करिता दि. २६ जुलै १९०२ मध्ये राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यातील प्रशासकीय सेवेतील ५० टक्के जागा राखीव करण्याचा ऐतिहासिक जाहीरनामा प्रसिद्ध केला. ही घटना भारताच्या सामाजिक इतिहासातील युगप्रवर्तक मानली जाते. सामाजिक असंतोष भारतीय समाजात खदखदत असताना राजर्षी शाहूंनी उचललेले हे पाऊल क्रांतीकारक मानावे लागेल. ब्रिटिश सरकारची, उच्चवर्गीयांची कोणतीही भीडभाड न ठेवता समतेचे स्वप्न साकार करण्यासाठी आरक्षण धोरणाचा स्विकार केला व प्रत्यक्ष त्यांची अंमलबजावणीही केली.

**अस्पृश्यांच्या शैक्षणिक कार्याविषयी राजर्षी शाहूंचे विचार**

बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार घडवून आणण्याच्या दृष्टीने शाहू महाराजांनी केलेले कार्य अत्यंत मोलाचे आहे. त्यांनी कोल्हापूरात निरनिराळ्या जातीच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह सुरु करुन त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था केली. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राज्यात प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्याचा कायदा केला. समाजातील जातीभेद, अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी अस्पृश्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणास प्रोत्साहन दिले. अस्पृश्यांच्या शैक्षणिक क्षेत्रात जनजागृती करण्याचे पहिले कार्य महाराष्ट्रात महात्मा ज्योतिबा फुले यांनी केले. त्यांचेच उर्वरीत कार्य पूर्ण करण्याचा प्रयत्न राजर्षी शाहू महाराजांनी केला. त्यासाठी राजदंडाचा प्रभावीपणे उपयोग केला. मागासलेल्या वर्गातील लोकांमध्ये शिक्षणाचा प्रसार व्हावा म्हणून प्राथमिक शिक्षणाचा खेडोपाडी प्रसार केला. अस्पृश्यांसाठी असलेल्या स्वतंत्र शाळेच्या संस्थेत त्यांनी वाढ केली. शाहू महाराज सत्तेवर आले तेव्हा ५ शाळा होत्या. १९१७ मध्ये त्यांची संख्या २७ झाली. अस्पृश्य विद्यार्थ्यांची फी माफीची सवलत त्यांनी दिली. राजाराम हायस्कूल व कॉलेजमध्ये अस्पृश्य विद्यार्थ्यांना मुक्त प्रवेश देण्याची भूमिका त्यांनी घेतली. राजर्षी शाहूंनी आपला मुलगा प्रिन्स शिवाजीच्या स्मरणार्थ १०,००० रु. ची ठेव करुन त्याच्या व्याजातून प्रत्येक अस्पृश्य विद्यार्थ्यास ५ रु. शिष्यवृत्ती दिली. अस्पृश्य समाजातील विद्यार्थ्यांना वकीली व ३ विद्यार्थ्यांना डॉक्टरकीचे शिक्षण दिले. डॉक्टर, वकील हे व्यवसाय फक्त उच्च जातीपूरतेच मर्यादित राहू नयेत अशी त्यांची इच्छा होती.

कोल्हापूर शहरात अस्पृश्य विद्यार्थ्यांची शैक्षणिक गैरसोय होऊ नये म्हणून 'मिस क्लार्क बोर्डींग' काढून त्यांच्या राहण्याची व्यवस्था केली. खाजगी खर्चातून ३ व सरकारी खर्चातून ४ अशी एकूण ७ वसतिगृहे सुरु केली. खाजगी खर्चातून सोनतळी स्टेशन, बंगला व रुकडी ही ३ वसतिगृहे तर पंढरपूर, नागपूर व नाशिक येथील अस्पृश्यांच्या वसतिगृहास त्यांनी भरीव मदत केली.

**अस्पृश्य निर्मूलन कार्य**

हिंदू समाजामध्ये मोठ्या प्रमाणात विषमता होती. सामाजिक ऐक्य दुभंगले गेले होते. राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी आपल्या सत्तेचा मोठ्या प्रमाणावर उपयोग करुन कृत्रिम जातीभेद मोडून काढण्यासाठी ठिकठिकाणी व्याख्याने दिली. सामाजिक विषमतेविरुद्ध परिषदा घेतल्या. अस्पृश्यांना सार्वजनिक पाणवठे व मंदिरे खुली केली. राजर्षी शाहू महाराज बोलके नव्हते तर ते एक कृतिशील समाजसुधारक होते. त्यांनी गंगाराम कांबळे या महार व्यक्तीला कोल्हापूरच्या भर रस्त्यावर 'सत्यसुधाकर हॉटेल' टाकून दिले व त्या हॉटेलमध्ये शाहू महाराज दररोज सकाळी चहा घेऊ लागले. हे दृश्य पाहून उच्चवर्णीय लोकही शाहूंचा आदर्श

घेऊ लागले. अस्पृश्य जातीच्या लोकांना रेव्हिन्यू, ज्युडिशियल, पोलीस व जनरल खात्यात नेमणूक देवून त्यांचा सन्मान केला जावा असे त्यांना वाटे. हजारो वर्षे हिंदू धर्मात अस्पृश्यांना ज्या व्यवसायात बंदी घातली होती ते सर्व व्यवसाय राजर्षी शाहूंनी त्यांच्यासाठी खुले केले. याच न्यायाने त्यांनी न्यायालयीन क्षेत्रात अनेक अस्पृश्य व्यक्तींची सनदी वकील म्हणून नेमणूका केल्या. कोल्हापूरच्या नगरपालिकेत चांभार, भंगी लोकांना सन्माननीय सदस्य म्हणून घेतले. ऐवढेच नाही तर दत्तोबा पवार या चांभार समाजातील व्यक्तीला नगरपालिकेचा चेअरमन म्हणून नेमले. एखाद्या नगरपालिकेचा चेअरमन हा अस्पृश्य असावा ही पहिलीच घटना असून सामाजिक इतिहासातील तो सोनेरी क्षण ठरतो.

अस्पृश्य समाजवर लादलेली हजेरी पद्धत शाहू महाराजांनी बंद केली. अस्पृश्य गुन्हेगारांना दररोज पोलीस ठाण्यावर हजेरी देणे बंधनकारक होते. गैरहजेरीची भीती दाखवून अनेक लोक त्यांच्याकडून फुकट काम करुन घेत. फार झाले तर त्याच्या पोटाला म्हणून काहीतरी थोडेसे देत. अस्पृश्यांवरील हा अन्याय, जुलूम नष्ट करण्याकरिता राजर्षी शाहूंनी २७ जुलै १९१८ मध्ये आदेश काढून हजेरी पद्धत बंद केली. हजेरी बंदीचा शाहू महाराजांनी काढलेला हा आदेश अस्पृश्य मुक्तीचा पहिला आदेश ठरतो. याच बरोबर राजर्षी शाहू यांनी महारकीचा वतनाचा शेवट केला. कारण की, त्याच्या वतनाला पाटील, कुलकर्णीच्या वतनाप्रमाणे सामाजिक प्रतिष्ठा नव्हती. महारकीच्या वतनामुळे त्यांना हीन दर्जाची कामे करावी लागत. त्या बदल्यात त्यांना मानपान म्हणून सुगीच्या दिवसात वर्षाकाठी पसाभर धान्य, शिळ्या भाकरीचे तुकडे किंवा हलक्या प्रतीच्या जमिनीचा तुकडा मिळत असे. अस्पृश्यावरील हा अन्याय दूर करण्यासाठी माणगाव जि. कोल्हापूर येथे २२ मार्च १९२० मध्ये महाराष्ट्रातील अस्पृश्य लोकांची परिषद घेण्यात आली. या परिषदेचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते तर प्रमुख वक्ते राजर्षी शाहू महाराज होते. आपल्या भाषणात शाहू महाराज म्हणाले, "सर्व महार लोक वतनाच्या मागे लागले आहेत त्यामुळे मला वेटबिगारी बंद करता येईना. बलूतेदार व महाराजांनी वतनाच्या मागे न लागता ती सोडून घ्यावीत. शेवटी महाराजांनी मे १९११ मध्ये महार वतने खालसा करुन त्यांना नौकरीत सामावून घेतले. स्पृश्य-अस्पृश्य यांची सहभोजने शाहू महाराजांनी घडवून आणली. जातीभेद मोडा, जातीभेद पाळणे हे पाप आहे. देशाच्या प्रगतीला अडथळा आहे असे ते म्हणत.

## निष्कर्ष

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, वि.रा. शिंदे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा सिंहाचा वाटा आहे. राजर्षी शाहू नुसता मराठा नव्हता, ब्राम्हणेत्तरही नव्हता तर तो नवयुगातला सर्वांगपूर्ण राष्ट्रपुरुष होता. तो महाराष्ट्राच्या विकासाचा एक मोठा स्वाभाविक तरंग होता हेच जास्त खरे. हिंदू समाजाला जातिशृंखलांनी जखडून टाकून माणसाचे माणूसपण हिरावून घेणारी धर्मसिंहासने राजर्षी शाहूंनी उलथी पालथी करुन टाकली. समाजातील वर्गभेद नष्ट झाला पाहिजे. मनुष्य जन्मतः वर्गविहीन आहे परंतु परंपरेमुळे वर्गभेद निर्माण होतात. जातीभेद स्पष्ट झाल्याशिवाय सामाजिक समता प्रस्थापित होऊ शकणार नाही असे शाहू महाराजांना वाटे. छत्रपती शाहूंच्या मते मनुष्य जन्मतः गुन्हेगार नसतो. त्याला सुधारणेची संधी दिली तर त्या संधीचे सोने करण्याची किमया त्यांच्या अंगी असते. यावर त्यांचा मोठा विश्वास होता.

केवळ जन्माने श्रेष्ठ मानल्या गेलेल्या समाजातील विशिष्ट लोकांना जे सुखसमृद्धीचे जीवन उपभोगता येते तेच जीवन मोठ्या प्रतिष्ठेने अस्पृश्यांच्या वाट्याला यावे म्हणून आपल्या संस्थानात ५०% जागा नौकरीत राखून ठेवणारा संस्थानातील पहिला संस्थानिक होता. राजर्षी शाहूंना केवळ २८ वर्षाच्या कारकिर्दीत समाजात क्रांतीकारी बदल घडवून आणले. त्यांनी स्विकारलेल्या पुरोगामी सामाजिक धोरणामुळे मागासवर्गीयामध्ये नवचैतन्य निर्माण झाले. प्रशासनातील उच्चवर्णीयांची मक्तेदारी संपुष्टात आली. सन १८८२ मध्ये महात्मा फुले यांनी हंटर शिक्षण आयोगाला जे निवेदन सादर केले त्या निवेदनाची स्वप्नाची पूर्तता राजर्षी शाहू महाराजांनी केली. "राजसत्ता जनतेच्या विकासासाठी असते आणि ती त्यासाठीच वापरली पाहिजे" असा क्रांतीकारी सिद्धांत राजर्षी शाहू महाराजांनी मांडला व त्या सिद्धांतास योग्य न्याय दिला.

## संदर्भ ग्रंथ


१. राजर्षी शाहू छत्रपती - धनंजय कीर - पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
२. आधुनिक महाराष्ट्रातील परिवर्तनाचा इतिहास - प्रा. दिनेश मोरे - के.एस. पब्लिकेशन, पुणे.
३. भारतातील सामाजिक चळवळी - डॉ. श्रीकांत गायकवाड, प्रा.रामकिशन मांजरे - अरुण प्रकाशन, लातूर.
४. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास - प्राचार्य डॉ.एस.एस. गाठाळ - कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद.
५. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास - डॉ. अनिल कठारे - विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद.
६. राजर्षी शाहू महाराज आणि वेदोक्त प्रकरण - उत्तम कांबळे - सुगावा प्रकाशन, पुणे.
७. वैदिक संस्कृतीचा विकास - तर्क जोशी लक्ष्मणशास्त्री
८. महाराष्ट्रातील समाजसुधारक विचारधारा व कार्य - डॉ. एस.एस. गाठाळ - कैलास पब्लिकेशन, औरंगपूरा, औरंगाबाद.
९. समाजशास्त्रीय विचारांचा मूलाधार - प्राचार्य डॉ.दा.धो. काचोळे - कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद. ❑❑❑

**OUR HERITAGE**
*ISSN : 0474-9030 Vol-68, Special Issue-11*
Impact Factor (2020) - 6.8

# "आर्य समाजी चळवळीचे हैद्राबाद मुक्ती लढ्यातील योगदान"

**प्रा.डॉ. रामचंद्र पांडूरंग पवार**
कला व विज्ञान महाविद्यालय,
चौसाळा, ता. जि. बीड.
मो. 9421344284

एखाद्या समाजात निर्माण झालेल्या सामाजिक समस्यांचे निर्मूलन करण्यासाठी मोठ्या स्तरावर समुदायाव्दारा केला जाणारा सामूहिक प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय. सामाजिक चळवळ ही समाज वा संस्कृतीत नवीन परिवर्तन करण्यासाठी किंवा त्या परिवर्तनाचा विरोध करण्यासाठी निर्माण होते. या चळवळीचा मुख्य उद्देश सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक क्षेत्रात पूर्णता किंवा अंशिक परिवर्तन करणे हा असतो. समाजात अशी स्थिती निर्माण होते की, लोक त्या स्थितीस सहन करु शकत नाहीत. म्हणून त्या स्थितीला बदलण्यासाठी चळवळ उदयास येते.

भारतीय धर्म, संस्कृती, समाज यात सुधारणा घडवून आपल्या धर्म व संस्कृतीचे खरे शुध्द रुप जगासमोर आणण्यासाठी स्वामी दयानंदांनी 10 एप्रिल 1875 मध्ये मुंबई येथे 'आर्य समाजाची' स्थापना केली. आपण सारे भारतीय आर्य आहोत आणि हे विश्व आर्यमय करण्याची आपली नैतिक जबाबदारी आहे. हे त्यांनी तरुणांच्या मनावर बिंबविले, खिस्ती व इस्लाम धर्माच्या प्रसाराला आळा घालून खिस्ती व इस्लाम आक्रमणाविरुध्द हिंदूना जागृत करण्याचे कार्य आर्य समाजाने केले. आर्य समाजी चळवळीने हैद्राबाद मुक्ती आंदोलनात मोलाचे योगदान दिले. आर्य समाजाच्या प्रखर लढ्यामुळेच हैद्राबाद मुक्ती लढ्यास पूर्णत्व प्राप्त झाले.

प्रस्तुत लघुशोधनिबंध "आर्य समाजी चळवळीचे हैद्राबाद मुक्तीलढ्याचे योगदान" या विषयावर आहे. या लघुशोधनिबंधासाठी इतिहास संशोधन पध्दतीतील चिकित्सक व वर्णनात्मक पध्दतीचा उपयोग करण्यात आलेला आहे. इतिहास संशोधनासाठी ऐतिहासिक साधन सामुग्रीचा उपयोग केला आहे.

**उद्दिष्ट्ये :–**

1. वैदिक धर्माची पुनरुज्जीवनाची चळवळ गतिमान करणे.
2. वैदिक धर्म व सामाजिक सुधारणेचा पुरस्कार करणे.
3 एकेश्वरवादाचा पुरस्कार करुन समाजात ऐक्याची भावना निर्माण करणे.
4. स्त्रियांची जाचक बंधनातून मुक्तता करणे व स्त्री शिक्षणास प्रोत्साहन देणे.
5. सामाजिक सलोखा निर्माण करुन त्याचा राष्ट्रीय एकात्मतेसाठी सहभाग करुन घेणे.
6. आर्य समाजाच्या माध्यमातून निजामाच्या जुलमी जोखडातून मराठवाड्यातील सामान्य जनता मुक्त करण्यासाठी जनआंदोलन उभारणे.
7. दलित उध्दारासाठी प्रयत्न करणे. निजाम सरकारने समान्य व गोरगरीब जनतेला वेठीस धरुन त्यांना इस्लाम धर्म स्विकारण्यास मजबूर केले होते. त्या विरोधात शुध्दीकरणाची मोहिम उभारणे.

भारतात असलेल्या 563 संस्थानापैकी हैद्राबाद हे एक संस्थान होते. इ.स. 1724 साली हैद्राबाद येथे निजाम–उल–मुल्क उर्फ आसफजाह कमरुद्दीन पहिला याने निजामशाहीची स्थापना केली. भारत स्वातंत्र्याच्या वेळी मीर उस्मान अलीखान हा शेवटचा निजाम सत्तेवर होता. या संस्थानात मराठवाडा, कर्नाटक आणि तेलंगणा हा प्रदेश समाविष्ट होता. हैद्राबाद संस्थानातील जनतेला स्वातंत्र्यासाठी सशस्त्र आंदोलन करावे लागले हे सशस्त्र आंदोलन भारतीय स्वातंत्र्याला पूर्णत्व प्राप्त करुन देणारा अंतिम लढा होता. हैद्राबाद संस्थानातील शेवटचा निजाम मीर उस्मान अलीखान हा होतात्र तो काशिम रझवीच्या रझाकार लष्करी संघटनेच्या जोरावर आपले संस्थान भारतीय संघराज्यात विलीन न करता स्वतंत्र ठेवण्यासाठी प्रयत्नशिल होता. म्हणून या संस्थानातील जनतेने हैद्राबादमुक्तीसाठी आंदोलन सुरु केले. यात आर्य समाजाने महत्त्वाची भूमिका पार पाडली.

हैद्राबाद संस्थानात इ.स. 1880 मध्ये प्रथम मराठवाड्यातील बीड जिल्ह्यातील ता. धारुर येथे आर्यसमाजाची स्थापना झाली. पुढे हैद्राबाद संस्थानात आर्य समाजाच्या 200 ते 250 शाखा संस्थानात होत्या. संस्थानातील जनतेत जनजागृती करुन आंदोलनाची पायाभरणी आर्य समाजाने केली नसती तर संस्थानातील संपूर्ण समाज हैद्राबाद स्वातंत्र्य आंदोलनात पेटून उठला नसता. सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणणे हे आर्य समाजाचे मूळ कार्य होते. या मूळ कार्याच्या माध्यमातून आर्य समाजाच्या नेत्याने संस्थानातील जनतेत ऐक्य निर्माण करण्याचा प्रयत्न

केला. या ऐक्यामुळेच हैद्राबाद मुक्तीलढ्यास गती प्राप्त झाली. त्यासाठी बॅरिस्टर केशवराव कोरटकर, धर्मवीर वामन नाईक, पंडित शामलाल बन्सीलाल, स्वामी श्रध्दानंद, वेद प्रकाश, देवदत्त मोहिते, पंडित नरेंद्रजी, गणपतराव वैद्य, माधवराव घेणीसीकर, याशिवाय अनेक आर्य समाजी नेत्याने संस्थानात दोरे काढून जनजागृती केली व पहिले स्वातंत्र्य आंदोलनाचे रणसिंग फुंकले. त्यासाठी प्रखर संघर्ष केला.

1941 च्या जनगणनेनुसार हैद्राबाद राज्यात आर्य समाजाची संख्या 40 हजारापर्यंत वाढल्याचे दिसून येते. आर्य समाजाचा हा विस्तार राज्याच्या, कर्नाटक, तेलंगण व मराठवाडा या तीन विभागाच्या परस्पर तुलनेत त्याचे प्राबल्य मराठवाड्यात जास्त असल्याचे दिसून येते. मराठवाड्यानंतर कर्नाटकातील बिदर, गुलबर्गा या दोन जिल्ह्यात आणि तेलंगणामध्ये हैद्राबाद व सिकंदराबाद या दोन शहरापर्यंत सत्याग्रहाची मर्यादा, धर्म आणि धार्मिक हक्क यांच्यापुरतीच मर्यादित केली होती.

हैद्राबादचे बॅ. विनायकराव कोरटकर हे आर्य समाजाचे अध्यक्ष होते तर बन्सीलालजी मुख्यमंत्री होते. श्री. बन्सीलालजीने उदगीरला आर्य समाजाचे मुख्य कार्यालय उघडले. 'वैदिक संदेश' नावाचे वृत्तपत्र सोलापूरला काढून ते हैद्राबाद संस्थानात सर्वत्र पोहचेल अशी व्यवस्था केली. या वृत्तपत्राच्या माध्यमातून मातृभूमिवरील प्रेम आणि वैदिक धर्मावरील निष्ठा या दोन मुख्य उद्दिष्टासाठी प्रत्येक आर्य समाजाने प्राणाची बाजी लावण्यासाठी तयार असावे असे विचार मांडले. हैद्राबाद मुक्तीलढ्यात भाई बन्सीलाल व शामलाल या उदगीरच्या दोघा बंधूनी हैद्राबाद संस्थानात फार मोठे कार्य केले. हिंदू समाजातील दुबळेपणा घालून त्यांना स्वाभिमानाने ताठ उभे करण्यास आर्य समाजातील प्रतिनिधीचे प्रधान बॅ.विनायकराव विद्यालंकार, नरेंद्रजी आर्य, बॅ. विनायकरावजी कोरटकर यांनी महत्त्वपूर्ण कार्य केले. आर्य समाजाच्या या सुधारणेमुळे राजकीय चळवळ गतिमान होत असल्याची जाणीव निजाम सरकारला झाली. त्यामुळे सरकारची वक्रदृष्टी आर्य समाजाकडे वळली. 1935 मध्ये निलंगा येथील हवनकुंड व आर्य समाज मंदिर सरकारने आपल्या गुंडामार्फत उध्दवस्त केले. या दुर्घटनेमुळे शेषरावजी वाघमारे अस्वस्थ झाले. त्यांनी हजारो लोकांना अत्याचाराचा बदला घेण्यासाठी गावोगावी शस्त्र सज्ज आर्य समाज संघटना स्थापन केल्या.

1932 मध्ये जेव्हा मुस्लिम धर्मप्रसारक व धर्मांतर मोहिम जोरात होती तेव्हा आर्यसमाजाने धर्मांतर मोहिमेस प्रखर विरोध केला. आर्य समाजाच्या कार्यामुळे मुस्लिम धर्मांतर मोहिमेला चांगला आळा बसला. तुरुंग, प्राथमिक शाळा वगैरे ठिकाणी धर्मांतरे बंद करावी लागली. आर्य समाजाच्या या कार्यामुळे सरकारने त्यांच्यावर निर्बंध घातले. याचा निषेध म्हणून आर्य समाजाने निजाम सरकारच्या विरोधात सत्यागृही चळवळी सुरु केली.

निजाम सरकारच्या दडपशाहीच्या निषेधार्थ 2 डिसेंबर 1934 रोजी हैद्राबादला सत्याग्रह केला. 1935 साली वैदिक आदर्श आणि त्यानंतर वैदिक संदेश या नियतकालिकावर सरकारने बंदी घातली. इ.स. 1934–37 साली तर आर्य समाजाच्या कार्यकर्त्यांना सरकारने कोंडीत पकडून त्यांना जगणे असहय केले. 'सत्यार्थ प्रकाश' हा ग्रंथ वाचणे किंवा जवळ बाळगणे हा गुन्हा ठरविण्यात आला. आर्य समाजी दीक्षा घेतलेल्या नोकरांना नोकरीतून कमी करण्याचे आदेश निजामाने दिले. या निजाम सरकारच्या दडपशाहीचा प्रतिकार करण्यासाठी इ.स. 1937 साली स्वामी रामानंद तीर्थ यांच्या नेतृत्वाखाली उस्मानाबाद येथे पहिला सत्याग्रह झाला. कॉंग्रेस नेते पंडित नरेंद्र व विनायकराव विद्यालंकार यांनी इ.स. 1938 साली संस्थानात सत्याग्रह पर्व आरंभिले. हा सत्याग्रह इ.स. 1938 पर्यंत म्हणजे दोन वर्षे चालू होता. या सत्याग्रहास देशातील सर्व जनतेने पाठींबा द्यावा म्हणून सोलापूर येथे माधवराव आणे यांच्या अध्यक्षतेखाली एक परिषद घेण्यात आली. हैद्राबाद राज्यातील सर्व आर्य समाजी कार्यकर्त्यांना अधिवेशनासाठी सोलापूरला येण्याचे आवाहन करण्यात आले. त्या प्रमाणे हजारो कार्यकर्ते सोलापूरच्या दिशेने येऊ लागले. या अधिवेशनासाठी दिल्लीहून स्वातंत्र्यानंदजी, नागपूरहून लोकनायक बापूजी आणे, पुण्याहून वि.दा. सावरकर, पंजाबहून नारायण स्वामी आदी नेत्यांना निमंत्रित करण्यात आले होते. मराठवाड्यातील त्यावेळच्या पाचही जिल्ह्यातून आर्य समाजाचे सत्याग्रही आले. याचा परिणाम म्हणून निजाम शासनाने सुधारणा जाहीर करुन आर्यसमाजाने केलेल्या धार्मिक स्वातंत्र्याच्या मागण्या मान्य केल्या. त्यामुळे 7 ऑगस्ट 1939 रोजी आर्यसमाजाने सत्याग्रह स्थगित केला. इ.स. 1939 पर्यंत आर्यसमाजाच्या वतीने एकूण 12 हजार सत्याग्रही तुरुंगात गेले होते. त्यापैकी 5000 सत्याग्रही स्थानिक होते. त्यात सर्वाधिक सत्याग्रही मराठवाड्यातील होते.

**हैद्राबाद स्टुंडटस युनियनचे कार्य :–**

मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी सोलापूर हे ठिकाण आर्थिकदृष्ट्या सोयीचे असल्यामुळे बरेच विद्यार्थी शिक्षणासाठी तेथील दयानंद कॉलेजात जात असत. इंग्रजाविरुध्द व निजामाविरुध्द पुकारलेल्या स्वातंत्र्य संग्रामासाठी तरुणांना प्रेरणा देण्याचे कार्य या कॉलेजने केले. या कॉलेजचा विद्यार्थी वर्ग आर्य समाजाने केलेल्या कार्याने भारावून जावून त्यांनी निजामाविरुध्द 'झेंडा सत्याग्रह' व 'वंदेमातरंम' सत्याग्रहात भाग घेऊन हैद्राबाद

मुक्तीलढ्यास प्रोत्साहन दिले. "आधी स्वराज्य मग शिक्षण" या ध्येयाने विद्यार्थी पेटून उठला होता. त्या काळातील दयानंद कॉलेजचे प्राचार्य श्रीराम शर्मा यांनी विद्यार्थ्यांना देशप्रेम व अन्यायाविरुध्द चिडून उठण्याची प्रेरणा दिली. त्यामुळेच लहान मोठ्या गावातही आर्य समाजाच्या शाखा सुरु झाल्या. सोलापूरहून प्रकाशित होणारे 'वैदिक संदेश' व 'सुदर्शन' मुखपत्राव्दारे लढ्याची माहिती सर्वांना मिळत असते.

स्वातंत्र्यसंग्रामातील पहिले बलिदान वेदप्रकाशजीने दिले. निजामाच्या व कासिम रझवीच्या रझाकारी मुस्लीम एकी करुन तरुणाची एक फळी तयार केली. या तरुणापैकीच एक म्हणजे वेदप्रकाश आर्य हे होते. वेदप्रकाशजी गावोगावी जावून निजाम सरकारच्या अन्यायी धोरण विरोधात हिंदूना वैदिक धर्माच्या ध्वजाखाली एकत्रित केले. त्यांच्या या कार्यामुळे हिंदू लोकांत नवचैतन्य निर्माण झाले. ते स्वातंत्र्य आंदोलनासाठी पेटून उठले. वेदप्रकाशजींच्या या कार्यामुळे तो घरी असताना अरब पठाणाने त्याचा खून केला. त्याचे मुंडके धडावेगळे केले व प्रेत गवंडी गल्लीत फेकून दिले. अशा रितीने 23 फेब्रुवारी 1937 रोजी वेदप्रकाशजी हुतात्मा झाले. हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्रामातील ते पहिले हुतात्मा ठरतात, त्यांच्या खुनामुळे आर्य समाजाचे आंदोलन थंड होण्याऐवजी अधिक तीव्र झाले. हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्रामात आर्य समाज आघाडीवर राहिला. स्वातंत्र्यसंग्रामातील आर्य समाजाची कामगिरी सूवर्णाक्षरांनी लिहिली जावे असे त्यांचे कार्य मोलाचे होते. या संग्रामात उदगीरचे श्यामलालजी, बन्सीलालजी, वेदप्रकाशजी, दत्तात्रय उत्तमराव, विष्णूभागवत या आर्यसमाजी नेत्यांनी स्वातंत्र्यासाठी बलिदान दिले.

स्वामी रामानंद तीर्थ हे हैद्राबाद मुक्तीलढ्याचे खरे प्रेरणास्थान होते. ते म्हणतात "15 ऑगस्ट 1947 रोजी भारत स्वतंत्र झाला. तरी अजून या देशामध्ये स्वातंत्र्यसूर्याचा प्रकाश पोहचू न शकलेला असा प्रदेश आहे आणि तो म्हणजे हैद्राबाद संस्थान." हैद्राबाद आणि भारत यांचे प्रादेशिकदृष्ट्या अतूट संबंध असल्यामुळे हैद्राबादचे स्वतंत्र अस्तित्व मान्य करणे शक्य नव्हते. निजामाने व रझाकारी लष्कराव्दारे संस्थानातील हिंदूवर अन्नवित छळ केला व काही हिंदूच्या कत्तली सुरु केल्या.हजारो हिंदू रझाकाराच्या हत्याकांडाला कंटाळून आजुबाजूच्या प्रंदेशात आश्रय घेऊ लागले. अखेर प्रजेने भारत सरकारकडे मदतीची मागणी केली. त्यानुसार भारत सरकारने हैद्राबाद संस्थानात "पोलीस ॲक्शनची कार्यवाही करुन अवघ्या चार दिवसांत हैद्राबाद संस्थान जिंकून 17 सप्टेंबर 19484 मध्ये भारतात विलीन केले."

**निष्कर्ष :–**

हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामात आर्य समाजाने मोलाचे योगदान दिले. आर्य समाजी कार्यकर्त्यांनेच स्वातंत्र्यलढ्याचे पहिले रणसिंग फुकले. हिंदू धर्मातील अनिष्ट प्रथा, रुढी व परंपरांचे उच्चाटन करुन सर्व जाती, धर्मातील लोकांना एका छत्राखाली आणण्याचा प्रयत्न केला. संस्थानात बळजबरीने मुस्लीम झालेल्या हिंदूना परत शुध्दकरण चळवळीव्दारे हिंदू धर्मात प्रवेश मिळवून दिला. सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी दलित उध्दाराचे कार्य हाती घेतले. आंतरजातीय विवाहास आणि पुनर्विवाहास प्रोत्साहन दिले. हुंडा बंदी, केशवपण या सारख्या अनिष्ट प्रथेपासून स्त्रियांची मुक्तता करण्याचा प्रयत्न आर्य समाजाने केला. संस्थानातील समाजात जनजागृती करुन त्यांना वैदिक धर्माचे तत्त्वज्ञान समजावून सांगितले. आर्य समाजाची हिंदू जनजागृतीची चळवळ सरकारने दडपण्यासाठी जो अन्याय केला त्याला प्रतिउत्तर म्हणून सत्याग्रह, सशस्त्र क्रांतीव्दारे निजामास उत्तर दिले. थोडक्यात मराठवाडा मुक्ती लढ्यात आर्य समाजाने मोलाचे योगदान दिले. त्यामुळेच हैद्राबाद संस्थान 17 सप्टेंबर 1948 मध्ये भारतात विलीन झाले. आर्य समाजी कार्यकर्त्यांचे बलिदान व्यर्थ गेले नाही. आर्य समाजाच्या कार्यामुळेच हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्राम यशस्वी झाला आणि भारतीय स्वातंत्र्यास सलगता प्राप्त झाली. आर्य समाजाने वैदिक धर्माचे पुन्नरुजीवन करुन हिंदू समाजाला मूळ वैदिक तत्त्वज्ञान समजावून सांगितले.

**संदर्भ :–**

1. भारतातील सामाजिक चळवळ – डॉ. श्रीकांत गायकवाड व प्रा. रामकिशन मांजरे – अरुण प्रकाशन, लातूर.
2. आधुनिक भारताचा इतिहास – डॉ. श्रीनिवास सातभाई – विद्या बुक्स पब्लिशर्स – औरंगपूरा, औरंगाबाद.
3. आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास – डॉ. अमित कठारे – विद्या बुक्स पब्लिशर्स – औरंगपूरा, औरंगाबाद.
4. महाराष्ट्रातील समाजसुधारक विचारधारा व कार्य – डॉ. एस.एस. गाठाळ – कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
5. हैद्राबादचा स्वातंत्र्यसंग्राम आणि मराठवाडा – श्री. अनंत भालेराव
6. हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्राम – पोतदार वसंत
7. मराठवाड्याचा इतिहास – डॉ. रोडे सोमनाथ – विद्या बुक्स पब्लिशर्स -- औरंगपूरा, औरंगाबाद.